# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 19.03.2025** **वार- बुधवार**

---

**भारत गौरव रेल्वे**

छत्रपती शिवाजी महाराजांशी संबंधित स्थळांना जोडणारी भारत गौरव रेल्वे लवकरच सुरु केली जाईल, अशी माहिती रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज लोकसभेत दिली.देशातल्या अनेक मोठ्या शहरातल्या रेल्वे स्थानकांची क्षमता वाढवण्याचं कां सुरू असून पुणे आणि हडपसर इथल्या रेल्वे स्थानकांचं आधुनिकीकरण कारून,त्यांची क्षमता वाढवण्याचं कां सुरू सुरू आहे,त्यानंतर या स्थानाकांवरून रेल्वे गाड्यांची संख्या वाढवली जाणार असल्याचंही वैष्णव यांनी सांगितलं.

**धुराडी बंद**

राज्यातील ऊस गाळप पूर्ण झाल्यानं 139 साखर कारखान्यांची धुराडी बंद झाली असून 61 कारखान्यांमद्धे अद्याप गळप सुरू आहे. आतापर्यंत सर्व कारखान्यांत एकूण ८२६ लाख ८७ हजार मेट्रिक टन उसाच गाळप पूर्ण झाल आहे. यंदा कोल्हापूर विभागाला 11 पूर्णांक 5 टक्के उतारा मिळाला आहे. तर पुणे विभागात 9 पूर्णांक 52 टक्के उतार्यानं 185 लाख 4 हजार क्विंटल उत्पादन झालं आहे.

**पं.आवा.**

पंतप्रधान आवास योजनेच्या माध्यमातून धानोरी, बाणेर, कोंढवा,बालेवाडी आणि वडगाव खुर्द या पांच भागात जवळपास 4 हजार 173 घरं बांधण्याचा नियोजन पुणे महापालिकेनं केलं आहे. तर आत्तापर्यंत

घरांसाठी 4 हजार 666 जणांचे अर्ज आले असल्याची माहिती महापालिकेचे नगर अभियंता प्रशांत वाघमारे यांनी दिली. या योजनेच्या पहिल्या टप्प्यात महापालिकेनं आत्तापर्यंत 2 हजार 918 घरांचं वितरण केलं आहे.

**कार्यशाळा**

राष्ट्रीय पुस्तक न्यास, सावित्रीबाई फूले पुणे विद्यापीठ,आणि समर्थ युवा फाउंडेशन यांच्या वतीन आयोजित कारण्यात आलेल्या होय मि लेखक होणारच या कार्यशाळेचा ज्येष्ठ साहित्यिक विश्वास पाटील यांच्या उपस्थितीत नुकताच समारोप करण्यात आला. वाचकांची दाद मिळविण्यासाठी उपलब्ध आहे त्या पलीकडे जाऊन लिहायचा प्रयत्न केला, तर तुमची प्रतिभा आणि प्रतिमा उठून दिसेल असे मत यावेळी बोलताना त्यांनी व्यक्त केलं. याप्रसंगी न्यासाचे अध्यक्ष मिलिंद मराठे, विद्यापीठाचे प्र कुलगुरू डॉ. पराग काळकर, , व्यवस्थापन समितीच्या सदस्या बागेश्री मंठाळकर, प्रसेनजीत फडणवीस, सागर वैद्य, प्राचार्य डॉ. संजय चाकणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

**पिं. चिं वृक्ष संवर्धन**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वृक्षसंवर्धन विभागाचं आर्थिक वर्ष 2025-26 साठी 57 कोटी 36 लाख 86 हजार रुपयांचं अंदाजपत्रक आज सादर करण्यात आलं. त्याला प्रशासक शेखर सिंह यांनी मान्यता दिली आहे. या अंदाजपत्रकातील रक्कम विविध उपक्रम,विकास कामं, फळाफुलांची प्रदर्शनं भरवणं,वृक्षगणना, पुर्नरोपण यासाठी खर्च केली जाणार आहे.

**आग**

हिंजवडी फेज 1 मध्ये आज सकाळी एका मिनी बस ला भीषण आग लागल्याची घटना घडली यामध्ये 4 जणांचा होरपळून मृत्यू झाला असून जखमींना खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. या दुर्घटनेची सखोल चौकशी व्हावी तसंच मृतांच्या कुटुंबीयांना योग्य ती आर्थिक मदत देण्यात यावी अशी

मागणी आमदार हेमंत रासने यांनी आज विधानसभेत केली आहे. भविष्यात अशा दुर्घटना टाळण्यासाठी वाहतूक व्यवस्थेच्या सुरक्षिततेसंदर्भात ठोस पावलं उचलावीत अशी मागणीही त्यांनी केली आहे.

**<u>अतिक्रमण कारवाई</u>**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाद्वारे थेरगाव च्या काही भागातील अनधिकृत बांधकामांवर आज कारवाई करण्यात आली यामध्ये एकंदर 1 हजार 3 शे 64 चौरस फुट बांधकामं पाडण्यात आली.

**<u>ऑटो रिक्षा</u>**

महिला सुरक्षिततेसाठी तसंच प्रवाशांची होणारी लूट थांबावी, यासाठी लवकरच स्वारगेट बसस्थानकावर प्रीपेड ऑटो रिक्षा सुरू करण्यात येणार असल्याची माहिती एसटी प्रशासनाकडून देण्यात आली. याचं फायदा प्रवाशांना होणार असून नियमानुसार दंर आकारले जाणा आहेत. यासंबंधीची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती एसटी विभाग नियंत्रक प्रमोद नेहूल यांनी दिली.

**<u>स्नेहाधार</u>**

स्नेहाधार, पुणे परिवारातर्फे दिला जाणारा ‘स्नेहाधार गौरव पुरस्कार’ पेण इथल्या ‘अहिल्या महिला मंडळ’ या संस्थेच्या संस्थापिका वासंती देव आणि बीडमधील कळसंबर इथं अनाथांसाठी ‘आपला परिवार’ या वृद्धाश्रमाची स्थापना करणाऱ्या मनीषा पवार यांना जाहीर झाला आहे. पुरस्कार वितरण येत्या शनिवारी गिरीप्रेमी संस्थेचे संस्थापक उमेश झिरपे यांच्या हस्ते होणार आहे.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज आकाश निरभ्र असून कमाल तापमान 39 अंश सेल्सिअस तर किमान 18 पूर्णांक 10 अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं. उद्या कमाल तापमानात किंचित घट होण्याचा अंदाज हवामान विभागाकडून वर्तवण्यात आली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**